दि बोदवड सार्वजनिक को-ऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटी लिमिटेड बोदवड संचलित

## कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड ता. बोदवड जि. जळगाव

## विद्यार्थी विकास कक्ष

कवाविमबो/विविक/ 08- /2022-23

दिनांक – 21.01.2023

**सूचना क्रमांक 14/138 /2023**

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, भारत निवडणूक आयोगाची स्थापना दिनांक 25 जानेवारी 1950 रोजी झाली असल्याने भारत निवडणूक आयोगाचा हा स्थापना दिवस देशभरात **"राष्ट्रीय मतदार दिन"** म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश्य हा मतदारांना, विशेषतः नव मतदारांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठी प्रोत्साहन देणे, सुलभरीत्या त्यांची नाव नोंदणी करून घेणे हा आहे. देशातील मतदारांना समर्पित केलेल्या या दिवसाचा उपयोग मतदारांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढावा म्हणून त्यांना जागरूक करण्यासाठी केला जातो. या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी विकास कक्षाद्वारे निबंध, वक्तृत्व, रांगोळी, चित्रकला, पोस्टर घोषवाक्य, इत्यादी स्पर्धांचे आयोजन दिनांक 25 जानेवारी 2023 रोजी सकाळी 10:00 वाजता महाविद्यालयात केलेले आहे. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे. स्पर्धेसाठीचे विषय खालील प्रमाणे:

1. निबंध स्पर्धा:

    विषय: मी मताधिकार बजावणार कारण...

2. वक्तृत्व स्पर्धा:

    विषय: आपल्या देशात लोकशाही रुजली आहे का?

3. चित्रकला स्पर्धा:

    विषय: 18 वर्षे पूर्ण झालेल्यांना मतदार नोंदणी करण्याचे आवाहन

4. घोषवाक्य स्पर्धा:

    विषय: 1. सर्वोत्कृष्ट शासन पद्धती लोकशाही

    2. मताधिकाराचे महत्व

डॉ. अजय पाटील
विद्यार्थी विकास अधिकारी

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड विद्यापीठ अनुदान आयोग अंतर्गत

प्राध्यापक अरविंद चौधरी
प्राचार्य